प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २७.०४.२०२०**

**नवी मुंबईतील सहाकारी गृहनिर्माण संस्थांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी- कोविड १९ करीता योगदान देण्याचे सिडकोचे आवाहन**

सर्वत्र जगभर थैमान घालणाऱ्या कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूचा सामना करायला महाराष्ट्र शासनास मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये आपले योगदान देण्याचे आवाहन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांच्यातर्फे त्यांच्या नवी मुंबईतील अधिकारक्षेत्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना करण्यात आले आहे.

कोविड-१९ विषाणूमुळे उद्भवलेल्या पॅनडेमिकचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे औषधे व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, रोजगार गमावलेल्या मजूर, कामगार आदी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना अन्न, निवारा व अन्य सुविधा पुरविणे इ. कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या कामांकरिता मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. याकरिता समाजातील व्यक्ती, संस्था, उद्योग समूह अशा विविध स्तरांतून येणारा आर्थिक मदतीचा ओघ हा मुख्यमंत्री सहाय्यता निधी- कोविड १९ मध्ये संकलित करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेणाऱ्या गृहनिर्माण संस्थांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून मुख्यमंत्री सहाय्यत निधीसही आपले आर्थिक योगदान देणे अपेक्षित आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे अशाप्रकारच्या सार्वजनिक हिताच्या उपक्रमाकरिता देण्यात येणारे आर्थिक योगदान हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६९ अंतर्गत कर सवलतीस पात्र करण्यात आले आहे. कोविड-१९ किंवा कोरोनाशी लढण्याकरिता नवी मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी

मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९ मध्ये मोठ्या प्रमाणावर आपले आर्थिक योगदान देण्याचे आवाहन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९ चा तपशील खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| Name of Account | : Chief Minister's Relief Fund-COVID 19 |
| Bank Saving Account | : 39239591720 |
| Bank | : State Bank of India |
| Mumbai Head Branch Fort | : 400023 |
| Branch Code | : 00300 |
| IFSC CODE | : SBIN0000300 |

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस आरटीजीएस/एनईएफटी द्वारे आर्थिक सहाय्य करू इच्छिणाऱ्यांनी गृहनिर्माण संस्थेच्या नावासह देण्यात आलेली रक्कम हा तपशील jointregcidco@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावा. तसेच धनादेशाद्वारे (चेक) रक्कम देऊ इच्छिणाऱ्यांनी श्री. यतिश पाटील यांच्याशी ९७६८०१४४१३ या मोबाइल क्रमांकावर किंवा नवी मुंबई को-ऑपरेटिव्ह हाउजिंग सोसायटी फेडरेशनच्या श्री. भास्कर म्हात्रे यांच्याशी ९८१९३०६९६७ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा.संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**